कर्मचारीवर्ग खाते

परिपत्रक क्रमांक ३३/१९९५

क्र. राप/आस्था/मागव/ २/५२२३.
म. रा. मा. प. महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग,
मुंबई – ४०० ००८. दिनांक : २५. ९. १९९५.

प्रादेशिक व्यवस्थापक,
रा. प. मुंबई / पुणे/ नाशिक / अमरावती/ औरंगाबाद/ नागपूर.

कार्यशाळा व्यवस्थापक,
रा. प. मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे / औरंगाबाद/ नागपूर.

विभाग नियंत्रक,
रा. प. भांडार विभाग, कुर्ला, मुंबई/ मुंबई / धुळे / जळगांव/ नाशिक / पालघर/ रायगड (पेण)/ रत्नागिरी / सिंधुदुर्ग / ठाणे / पुणे / अहमदनगर / कोल्हापूर/ सांगली / सातारा/ सोलापूर/ औरंगाबाद/ बीड / जालना/ लातूर / नांदेड / उस्मानाबाद/ परभणी / नागपूर/ अकोला/ अमरावती / भंडारा/ बुलढाणा/ चंद्रपूर/ वर्धा / यवतमाळ.

विषय : रा. प. सेवेमध्ये मागासवर्गीयांकरिता असलेल्या विविध सवलती, आरक्षणाबाबतची अंमलबजावणी करण्यास टाळाटाळ, कुचराई करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई.

संदर्भ : या खात्याचे पत्र क्र. राप/आस्था/मागव/आ.अ.मो/९७/४८८५, दिनांक ११. ९. १९९५.

...

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी–१०९३/६६७/९६–ब, दिनांक १२ जून, १९९५ अन्वये उपरोक्त विषयावर सविस्तर सूचना प्रसारीत केलेल्या आहेत. उपरोक्त संदर्भित परिपत्रकानुसार शासनाचे सदरचे परिपत्रक आपणाकडे पाठविण्यात आलेले आहे. शासनाचे असे निदर्शनास आलेले आहे की, रा. प. सेवेमध्ये मागासवर्गीयांकरिता सरळ सेवा भरती तसेच पदोन्नतीमध्ये निरनिराळ्या पदासाठी आरक्षण ठेवण्यात आलेले आहे. तसेच इतर सवलती देखील देण्यात आलेल्या आहेत. तसेच ऑगस्ट १९८९ ते मार्च, १९९२ आणि ऑगस्ट, १९९३ ते ३१. १२. ९४ पर्यंत शासनाने मागासवर्गीयांचा अनुशेष भरून काढण्यासाठी विशेष भरती मोहीम राबविली होती परंतु, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांचे काटेकोरपणे पालन केल्या गेले नाही. किंबहुना आदेशांचे पालन करण्यास टाळाटाळ, कुचराई झालेली आहे.

शासनाने या पूर्वीच दिनांक २१. ३. १९८९, १५. १०. १९९० व दिनांक २८. ७. १९९३ च्या आदेशान्वये सूचित केले होते की, आदेशांची अंमलबजावणी करण्यास टाळाटाळ, कुचराई केल्यास संबंधीत अधिकारी/ कर्मचारी शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील व तशा प्रकारे कारवाई केली जाईल. सदरचे आदेश आपल्या निदर्शनास आणून देण्यात आलेले आहेत. तथापि, वेळोवेळी आदेश निर्गमित करूनही मागासवर्गीयांचे आरक्षण, शिल्लक अनुशेष भरून काढण्यासाठी काही अधिकारी योग्य ती दखल घेत नाहीत असे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे निदर्शनास आले आहे. संबंधीत कर्मचाऱ्यांनी/ अधिकाऱ्यांनी मागासवर्गीयांचे आरक्षण, अनुशेष भरून काढण्याच्या आदेशांची अंमलबजावणी करण्याबाबत जी अनास्था

..२..